# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## ( शिक्षण विभाग )

क्र.३२५७/शि.वि. दि.। /10/2014.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. व माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :— भारत सरकारव्दारा राबविण्यात येणाऱ्या "स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय" या मोहीमेचा अमंलबजावणीबाबत.**

**संदभ :—1)मा.शिक्षण संचालक, (प्राथ.) महाराष्ट्र राज्य, पूणे —1 यांचे पत्र क्र. संकीर्ण /2014/स्वच्छ भारत /ड 516/5140 दि. 23.09.2014**
**2) कार्यालयीन पत्र क्र.302/शि.वि./2014 दि. 26.09.2014.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारत सरकारने 2 ऑक्टोंबर 2014 रोजी महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून स्वच्छ भारत मोहीम राबविण्याचे ठरविलेले आहे त्या माध्यमातून दि. 25 सप्टेंबर 2014 ते 31 ऑक्टोंबर 2014 या कालावधीत "स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय" ही मोहीम राबविण्यात येणार आहे. त्या अंतर्गत वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, स्वच्छता गृह, स्वयंपाक गृह, क्रिडांगण स्वच्छता करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या निबंध, चित्रकला, स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. "स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय" या मोहीमेत संदर्भिय पत्र क्र. 2 मधील नियोजनानुसार खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

1) विद्यार्थी, पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था , शाळा व्यवस्थापन समिती यांना या मोहीमेत उत्स्फुर्त सहभागी करून घ्यावे.
2) परीपाठात स्वच्छतेची माहिती देण्यात यावी काही विद्यार्थ्यांना याबाबत बोलावयास प्रेरीत करावे. महात्मा गांधीजीचे स्वच्छता विषयक सुवचने, संदेश आणि प्रत्यक्ष कृती शाळेत करून घ्यावी.
3) वर्ग स्वच्छता, मैदान स्वच्छता, ग्रंथालय, प्रयोगशाळेसह शाळा परीसर स्वच्छ करावा. विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, तरूण मंडळी, स्वयंसेवी संस्था यांचे या कामी सहकार्य घ्यावे.
4) शाळा मैदानावरील आणि शाळेतील प्रतिमा आणि पुतळांची स्वच्छता करावी.
5) पेयजल व्यवस्थापन आणि स्वच्छतागृहाची स्वच्छता अधिक उत्कृष्टपणे करावी.
6) शाळा उद्यानाचे स्वच्छताकरण आणि नविनीकरण करावे.
7) शाळा इमारतीत रंग रंगोटी आणि सुशोभिकरण करावे.
8) शाळा स्तरावर आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्व विशद करणाऱ्या निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व प्रदर्शनी आयोजित करावी.
9) विद्यार्थी संसदेचे आयोजन करावे आणि त्यामार्फत या विद्यालयी स्वच्छता अभियानाचे पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करावे.
10) सदर अभियानास प्रसार माध्यमामार्फम व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात यावी.

वरीलप्रमाणे उपरोक्त मोहीम राबवून हीच मोहीम दि. 31 ऑक्टोंबर 2014 ते 15 ऑगष्ट 2015 या कालावधीपर्यंत मोहीम सुरू ठेवण्यात येणार आहे. त्यामध्ये माहिती पट, आरोग्य विषयक उपक्रम, भुमिका पालन, प्रदर्शने, विविध स्पर्धा याबाबी कार्यान्वीत करावयाच्या आहे तरी सदरील योजनेची प्रभावीपणे कटाक्षाने अमंलबजावणी करावी.

दि. 2 ऑक्टोंबर 2014 या महात्मा गांधी यांच्या जन्मदिनी शाळेत प्रभातफेरीचे आयोजन करून संदर्भिय पत्रे व वर नमूद केल्याप्रमाणे शक्य तेवढे उपक्रम राबवून कार्यक्रमाचा अनुपालन अहवाल कार्यालयास सादर करावा.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका,नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc